**<u>अर्जदार तर्फे सा.क्र.१ विजय मारुती बाणे यांचा उलटतपास गैरअर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

१०. हे म्हणणे खरे आहे की, माझा रेग्युलर दिवाणी मुकदमा नं.२९/२०१४ हा दावा न्यायालयाने दि.१८/०४/२०१८ रोजी काढून टाकला. न्यायालयाने दावा काढून टाकते वेळेस नोंदवलेले निरीक्षणे मी पाहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८/०४/२०१८ पुर्वीच्या २२ तारखांना आम्ही दावा चालवला नाही या कारणावरुन न्यायालयाने दावा काढून टाकला. हे म्हणणे खरे आहे की, आमचा दावा प्रथमत: दि.०७/१२/२०१६ रोजी सुनावणीस लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.७/१२/२०१६ पासून दि.१८/०४/२०१८ पर्यंत आम्ही बऱ्याच मुदती घेतल्या.

११. माझे शिक्षण १२ वी पास इतके झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ऑपेरा हाऊस मुंबई येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.७ विनोद मारुती बाणे, सामनेवाला क्र.८ विक्रम मारुती बाणे हे माझे भाऊ आहेत.हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.९ शालीनी बाणे ही माझी बहीण आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.१० योगेश मारुती बाणे हा माझा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.११ इंदिरा मारुती बाणे ही माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.१२ विष्णू कृष्णा बाणे हे माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र.७ ते १२ हे ऑरबीट– बी, तिसरा माळा, रुम नं.३०२ जे.डी. मार्ग, नाना चौक मुंबई येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, मूळ दावा हा मी स्वत: व सामनेवाला क्र.७ ते १२ यांनी मिळून केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही सर्वांच्या सह्या दाव्यावर झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील मजकूर आम्हा सर्वांना माहीत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरी करतो. मी गेली २८ वर्षे नोकरी करतो. विनोद मारुती बाणे हा काही काम करत नाही. विक्रम मारुती बाणे हे मयत झाले आहेत. विक्रम बाणे देखील काही काम करत नसे, तो घरीच असे. विनोद हा देखील घरीच असतो. योगेश मारुती बाणे हे देखील मयत झाले आहेत. योगेश देखील काही काम करत नसे, तो देखील घरीच असे. हे म्हणणे खरे आहे की, आमची आई इंदिरा मारुती बाणे आजारी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची आई कधीही आजारी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या आईसोबत माझे इतर भाऊ विक्रम, योगेश, विनोद हे राहत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझे भाऊ माझ्या आईची काळजी घेत असत. हे म्हणणे खरे आहे की, माझे भाऊ विनोद, विक्रम, योगेश तसेच बहीण शालिनी व चुलता विष्णू यांना दाव्याच्या कामी न्यायालयात उपस्थित राहण्यास काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या दाव्यावर सहया असल्याने त्यांना दावा चालवण्यास काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई

आजारी नसल्याने मला दावा चालवण्यास काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर आईची जबाबदारी असल्याने तसेच आई आजारी असल्याने मला दावा चालवण्यास येण्यास अडचण होती हे मी खोटे सांगत आहे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, सन १९३८ सालचे खरेदीखत सामनेवाला यांनी दाव्याच्या कैफियतीमध्ये कबूल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदर खरेदीखताबाबत दुय्यम पुरावा देण्याची आम्हाला गरज नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९३८ सालच्या खरेदीखताची सही शिक्क्याची नक्कल अभिलेखावर दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सहीशिक्क्याची नक्कल अभिलेखावर हजर केल्यामुळे याबाबत दुय्यम पुरावा देण्याची गरज नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम पुराव्याकरिता न्यायालयात निष्कारण मुदती घेतल्या.

१३. हे म्हणणे खरे आहेकी, आमच्या मूळ पुरुषाचे नाव महादेव कृष्णा बाणे असे होते. हे म्हणणे खरे आहे की, महादेव यांना कृष्णा, नारायण, अनंत, विठ्ठल असे चार मुलगे होते. हे म्हणणे खरे आहे की, अनंत यांना वारस नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा याला मारुती व विष्णू हे दोन मुले होती. (अर्जदार तर्फे वकील यांनी असा आक्षेप नोंदवला की, सदर प्रश्न हे दाव्याच्या संदर्भातील आहेत.) हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: व अर्जदार क्र.८ ते ११ हे मारुती यांचे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नारायण याला महादेव, राजाराम, दत्ताराम असे तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, महादेव हे प्रतिवादी क्र.१ व दत्ताराम प्रतिवादी क्र.२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ ते ५ हे दत्ताराम याचे वारस आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला दाव्यामध्ये कोणतीही मेरीट नसल्याने दावा चालवण्यास आम्ही वेळ काढला. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा मिळकत ही कृष्णा, अनंत, नारायण, विठ्ठल यांची एकत्रित मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत चौघांनी विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी)

दि. १६/०७/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड